## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥
## ॥आरती उल्हास भागीरथीची॥

जय जय उल्हासी,जीवनदाती पश्चीमवाहीनी
आनंद तुझीया दर्शने आणसी जीवनी ॥धृ॥

देवेंद्राने तुजला देता आदेश
गिरी सहयाद्रित प्रकट झालीस
वाहुनि जना करिसी पावन कृतकृत्य
तुझा महिमा आम्ही जन गातो नित्य ॥1॥

ज्याज्या क्षेत्रातून नित्य प्रवाहित होसी
देऊन अभ्युदय जीवा तू निःश्रेयस करीसी ।
प्रवाह पतितांना तू नित्य करीसी पावन ।
सर्वांसाठी समहोऊन अर्पिशी जीवन ॥2॥

तुझी भक्ती नित्य अर्पि संतऋषीचरणा
संतसंगाची सतत तू धरिशी आस मना
त्यांच्या पुण्ये तू नित्य पवित्र राहशी
जडजीवा उदधरुन तू निरंतर पाहसी ॥3॥

★★★★★